आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२२ मे २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी २ लाख १० हजार ८७४ कोटी रुपये अतिरिक्त निधी केंद्र सरकारला द्यायला रिझर्व्ह बँकेची मंजुरी
- कोरोना विषाणूच्या केपी-२ या उपप्रकाराचे सर्वाधिक रूग्ण पुणे जिल्ह्यात
- पुण्यातल्या पोर्शे कार अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपीच्या वडलासह तिघांना २४ मेपर्यंत पोलीस कोठडी

**आणि**

- येत्या दोन दिवसात राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता

<><><><><>

२०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी २ लाख १० हजार ८७४ कोटी रुपये अतिरिक्त निधी केंद्र सरकारला द्यायला रिझर्व्ह बँकेनं मंजुरी दिली आहे. रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय संचालक मंडळाच्या आज मुंबईत झालेल्या ६०८ व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. भारतीय अर्थव्यवस्था लवचिक आणि मजबूत असल्यानं केंद्रीय राखीव निधी साडेसहा टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय गर्व्हनर शक्तिकांत दास यांनी या बैठकीत घेतला आहे.

<><><><><>

कोरोना विषाणूच्या केपी-२ या नव्या उपप्रकाराचे सर्वाधिक, ५१ रूग्ण पुणे जिल्हयात आढळून आले आहेत. केपी-२ हा जेएन-१ चा उपप्रकार आहे. त्याचा संसर्ग आठ फेब्रुवारी रोजी पुण्यात संकलित केलेल्या रूग्णांच्या नमुन्यांमध्ये प्रथम आढळून आला. सध्याच्या रूग्णांच्या नमुन्याचे जिनोम सिक्वेन्सिंग केले असता ७० टक्के नमुने केपी-२ पॉझिटिव्ह आढळून आले. कोरोना विषाणूच्या संसंर्गाविरूध्द प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांमधेही याचं संक्रमण होऊ शकतं,

अशी माहिती जिनोम सिक्वेन्सिंगचे राज्य समन्वयक डॉ. राजेश कार्यकर्ते यांनी दिली.

<><><><><>

राज्यातली लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया आता संपली आहे, तेव्हा राज्य सरकारने आता दुष्काळाकडे गांभीर्यानं लक्ष द्यावं, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. संपूर्ण राज्य दुष्काळानं होरपळत आहे. धरणांमधला पाणीसाठी जेमतेम आहे. हजारो गावांना, वस्त्यांना पिण्याचं पाणी नाही. राज्यातल्या २३ जिल्ह्यांमध्ये, विशेषतः मराठवाड्यात पाणीटंचाईची समस्या भीषण आहे. जनावरांना चारा नसल्यानं दूध उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहेत. यासाठी आचारसंहिता शिथील करून आवश्यक ते निर्णय सरकारनं घ्यावेत, चारा छावण्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी पटोले यांनी आज प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात केली आहे.

<><><><><>

देशाच्या सागरी सीमांशी संबधित हितरक्षणासाठी भारतीय नौदल नेहमी सुसज्ज असणं आवश्यक आहे असं प्रतिपादन नौदल प्रमुख दिनेश त्रिपाठी यांनी केलं. ते नवी दिल्ली इथं नौदल मुख्यालयात नौदल अधिकाऱ्यांना संबोधित करत होते. भारतीय नौदलाने आत्मनिर्भर होण्यावर भर दिल्याचं ते म्हणाले.

सध्याच्या तसंच भविष्यातल्या आव्हानांवर मात करण्यासाठी नौदलाने अत्याधुनिक आणि स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर केला आहे असं त्यांनी सांगितलं. नौदल कर्मचारी सेवेत समर्पणवृत्ती आणि व्यावहारिकता यांचा मेळ साधत असल्याची त्यांनी प्रशंसा केली.

<><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज तेहरान इथं पोहोचले. इराणचे राष्ट्राध्यक्ष सय्यद इब्राहीम रईसी आणि परराष्ट्र मंत्री हुसैन अमीर अब्दुल्लाहियान यांच्या

निधनाच्या शोकसभेत ते सहभागी होतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू , प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनीही आपले शोकसंदेश इराण सरकार आणि जनतेप्रती पाठवले आहेत. भारताचे परराष्ट्रव्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी काल नवी दिल्लीतील इराणच्या दूतावासात जाऊन या दुःखद घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला. काल देशात या घट्नेनिमित्त दुखावटा पाळण्यात आला.

**<><><><>**

राज्यपाल रमेश बैस यांनी बुद्धपौर्णिमेनिमित्त राज्यातल्या जनतेला नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान बुद्धांनी दिलेली अहिंसा, शांती आणि करुणेची शिकवण व्यक्ती, समाज तसेच राष्ट्रांना नेहमीच मार्गदर्शक आहे. आज ही शिकवण पूर्वीपेक्षा अधिक प्रासंगिक आहे, असं राज्यपालानी आपल्या संदेशात म्हटले आहे.

केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही बुध्दपौर्णिमेनिमित्त सर्व भारतीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. बौद्ध धम्म हेच लोकशाही विचारांचं उगमस्थान आहे, विश्वशांती, अहिंसा, समता, विश्वबंधुतत्व आणि वैज्ञानिक दृष्टीकोन बौध्द धम्मानंच जगाला दिला. युध्दाच्या रक्तपातापासून जगाला वाचवण्यासाठी आजही जगाला भगवान बुध्दाच्या विचारांची गरज आहे, असं आठवले यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

पुण्याच्या कल्याणीनगरमधल्या पोर्शे कार अपघात प्रकरणातल्या अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल, संबंधित बारचे चालक जितेश शेवनी आणि जयेश बोनकर अशा तिघांना आज सत्र न्यायालयानं २४ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

दरम्यान, विशाल अग्रवाल याला न्यायालयात घेऊन आलेल्या पोलिसांच्या वाहनावर शाई फेकणाऱ्या काही जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. दोन्ही बाजूंचे

युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयानं तिघांची रवानगी पोलीस कोठडीत केली. १९ मे रोजी पहाटे अडीचच्या सुमाराला झालेल्या या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

पुण्यात कल्याणीनगरमधे झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर पुणे प्रादेशिक परिवहन विभागानं विनानोंदणी वाहनांवर कारवाई सुरू केली आहे. रस्त्यावर अशी वाहनं दिसली तर त्यांची विक्री करणाऱ्या वितरकाचा व्यवसाय परवाना १५ दिवसांपासून ते ६ महिन्यांच्या कालावधीसाठी निलंबित होईल अशी माहिती पुण्याचे प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी दिली.

शहरातल्या सर्व पब्ससह इतर परमिट रूमची विशेष तपासणी मोहीम राज्य उत्पादन शुल्क विभागानं हाती घेतली आहे. नियमांचं उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांचे मद्य विक्रीचे परवाने निलंबित किंवा रद्द होतील अशी माहीती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे विभागीय उपआयुक्तांनी दिली.

<><><><><>

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेच्या आठ सदस्यांना मद्रास उच्च न्यायालयाने गेल्या वर्षी दिलेला जामीन सर्वोच्च न्यायालयाने आज रद्द केला आणि त्यांना आत्मसमर्पण करायला सांगितलं. मद्रास उच्च न्यायालयानं १९ ऑक्टोबर २०२३ रोजी या आठ जणांना दिलेल्या जामिनाविरोधात राष्ट्रीय तपास यंत्रणेनं सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

न्यायमूर्ती बेला त्रिवेदी आणि न्यायमूर्ती पंकज मित्तल यांच्या खंडपीठानं आज त्यांचा जामीन रद्द केला. देशाची सुरक्षा नेहमीच सर्वोच्च असते हिंसात्मक किंवा अहिंसात्मक, कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाला आळा घालणं गरजेचं असतं, असं मत खंडपीठानं सुनावणीदरम्यान मांडलं. या आठ जणांना राष्ट्रीय तपास यंत्रणेनं सप्टेंबर २०२२ मध्ये अटक केली होती.

**<><><><><>**

नरवीर चिमाजी आप्पा यांनी पराक्रम गाजवून जिंकलेल्या वसईच्या किल्ल्याचा २८६वा विजय दिन उद्या साजरा केला जाणार आहे. दरवर्षी बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी हा दिवस साजरा होतो. वसईच्या किल्ल्याचा इतिहास, इथलं पर्यटन, लोकसंस्कृती, खाद्यसंस्कृती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवणं हा, वसई विजयोत्सव दिन नावाच्या या एक दिवसीय कार्यक्रमाचा उद्देश आहे.

बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी गुरुवारी वज्रेश्वरी मंदिरातून मशाल पेटवून दुचाकी फेरीद्वारे ती वसईच्या पारनाक्याजवळ आणली जाईल. तिथून नरवीर चिमाजी आप्पा स्मारकापर्यंत मशाल मिरवणूक काढली जाईल.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज २६८ अंकांची वाढ झाली आणि तो ७४ हजार २२१ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ६९ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ५९८ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत पात्रता फेरीतला दुसरा सामना आज राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात होणार आहे. अहमदाबादमधल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर थोड्याच वेळात म्हणजे संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

या सामन्यातला विजेता संघ आणि सनरायझर्स हैदराबादच्या संघात येत्या शुक्रवारी सामना होईल. या स्पर्धेतला अंतिम सामना येत्या रविवारी होणार आहे.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस आज दक्षिण अरबी समुद्राचा काही भाग, मालदीवचा आणखी काही भाग, कोमोरिन क्षेत्र आणि दक्षिण बंगालच्या उपसागरात तसंच अंदमान-निकोबार बेटं आणि अंदमान समुद्राच्या आणखी काही भागात पुढं सरकला आहे. वातावरणात खालच्या थरातली वाऱ्याची द्रोणीय रेषा आज वायव्य राजस्थान ते कर्नाटकापर्यंत मध्य महाराष्ट्रामार्गे जात आहे.

येत्या दोन दिवसात राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात उत्तर-मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//